# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २१/०५/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २१/०५/२००४ रोजी सभा सुचना क्र. ०२ दि. १७/०५/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ३) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ५) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ६) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ७) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ८) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ९) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १०) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ११) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| २) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| ३) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |

### रजेचा अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| २) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, सभा सुरु होण्यापुर्वी मला असे विचारायचे आहे की, ही सभा व्हॅलिड आहे का? कारण विधानपरिषदेचे इलेक्शन सुरु होणार आहे आणि आचारसंहिता पण असेल.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

अजूनही आचारसंहिता लागू झाल्याचा आदेश प्राप्त झालेला नाही आणि इतर महापालिकेतसुद्धा सभा चालू आहेत. कल्याण डोंबिवलीला पण चालू आहेत. ठाण्याला चालू आहेत. सगळीकडे सभा चालू आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

आपण विचारले होते का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आयुक्तांनी चौकशी करुनच सभा लावली.

**रिटा शाह :-**

मा. सभापती साहेब, सर्वप्रथम भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय श्री. राजीव गांधी यांची १३वी पुण्यतिथी आहे. त्याबद्दल हे सभागृह त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे. असा मी ठराव मांडीत आहे.

**आसिफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे. सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली वाहायची आहे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, आजचा दिवसच बसा आहे. सुखाचा आणि दुःखाचा एकत्र दिवस आहे. कारण भारताचे माजी स्वर्गीय राजीव गांधी पंतप्रधान होते. त्यांची आज पुण्यतिथी आहे. परंतु, त्यांनी जे स्वप्न या भारतासाठी बघितले होते, भारत वर्षासाठी. ते स्वप्न आज साकार झालेले आहे. मा. काँग्रेस पक्षाच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांनी त्यांचे स्वप्न पूर्ण करायला विदेशीचा मुद्दा समोर येऊनसुद्धा देशवासी म्हणून जी लढत आपल्या भारत वर्षामध्ये दिली. त्याचा आज परिणाम जनादेश जो झाला त्या विदेशीबद्दल स्वदेशीचा जो जनादेश झाला त्या जनादेशाच्या हिशोबाने आज भारत वर्षामध्ये काँग्रेस पक्षाने तो प्रचंड बहुमताने विजय मिळविला आहे आणि आज आमचे मनमोहन सिंग पुढचे पंतप्रधान होणार आहेत असा आदेश जाहिर झालेला आहे. त्याबद्दल दुःखाचा दिवस असून दुःखाचा नाही. परंतु, मला असे वाटते की, काँग्रेस पक्ष आणि राजीव गांधींचे स्वप्न साकार होण्याचा चांगला दिवस आहे. चांगले स्वप्न आपल्याला पावलेले आहे. खरे झालेले आहे. म्हणून मी अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनंत पाटील :-**

मी एक अभिनंदनाचा ठराव मांडतो. ठाणे लोकसभा मतदार संघातून भाजपा, शिवसेनेचे उमेदवार प्रकाशजी परांजपे हे प्रचंड बहुमतानी निवडून आल्याबद्दल मी त्यांचा अभिनंदनाचा ठराव मांडतो.

**प्र. सचिव (विजय पाटील) :-**

सभेला सुरुवात होण्यापुर्वी दोन रजेचे अर्ज आलेले आहेत. सन्मा. सदस्य मिलन वसंत म्हात्रे यांचा अर्ज आहे. सन्मा. सदस्य याकुब ईस्माइल कुरेशी आज उपस्थित राहणार नाहीत. म्हणून त्यांचा एक अर्ज आलेला आहे.

**अनंत पाटील :-**

सभेला सुरुवात करण्यापुर्वी मी सभागृहाला एक सांगू इच्छितो की, गेल्या स्थायी समितीच्या सभेमध्ये जकात विषयी आपली चर्चा झाली होती. जकातीनंतर त्या जकातीमध्ये काय परिवर्तन झालेले आहे. जकातीच्या नाक्यामध्ये आजची परिस्थिती काय आहे. या संदर्भामध्ये काही खुलासा करावा अशी मी विनंती करतो.

**(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)**

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेब, मागील स्थायी समितीच्या सभेमध्ये ३६ कोटी २७ लाखाचे जकातीचे टेन्डर मंजूर केलेले आहे. त्या मंजुर केलेल्या टेन्डरच्या विरोधात सहकार एजन्सी यांनी डिस्ट्रीक्ट कोर्टात केस चालू असल्यामुळे त्या केससंबंधी सविस्तर चर्चा इथे होऊ शकणार नाही. मात्र केस चालू आहे. काही किरकोळ मुद्यांवर केस चाललेली आहे. परंतु, मुदत संपल्यानंतर प्रत्येक दिवसाला १३ लाख रुपये भरण्याची कोर्टाची ऑर्डर आहे. त्यामुळे प्रत्येक दिवशी महानगरपालिकेला १३ लाख रुपये मिळतात आणि जो कोर्टातून निर्णय होईल त्याप्रमाणे पुढील कारवाई केली जाईल.

**रिटा शाह :-**

हे १३ लाख कोण भरणार?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सहकार एजन्सी भरणार. मुदत संपलेल्या तारखेपासून.

**रिटा शाह :-**

आणि ते कुठल्या बेसवर ते कोर्टात गेले.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

बेस असा आहे की, डिमांड ड्राफ्ट त्यांनी त्या पाकिटात घालून दिले होते. ते ओपनमध्ये द्यायला पाहिजे होते. नंतर ते कंपनी रजिस्ट्रेशन व्यवस्थित आहे का?

**रिटा शाह :-**

म्हणजे आता त्यांनी टेन्डर भरले आहे आणि त्यांना मिळाले आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

आता जो पुर्वीचे ठेकेदार जकात चालवतो हे नवीन ठेकेदाराविरुद्ध कोर्टात गेले. नवीन ठेकेदार आणि महानगरपालिकेविरुद्ध गेले.

**रिटा शाह :-**

मग आता जकात कोण चालवतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

पुर्वीची एजन्सीच चालवितो. पुर्वी दररोज ९ लाख रुपये भरत होती. आता १३ लाखाची ऑर्डर आहे. म्हणजे आता आपले जे टेन्डर आहे. त्या टेन्डरपेक्षाही जास्त रक्कम आपल्याकडे मिळते.

**रिटा शाह :-**

मिळते हे बरोबर आहे. कोर्टाने असा आदेश केला की, मागचे जे ठेकेदार आहेत त्यांनी कन्टीन्यु रहायचे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

नाही. रहायची अशी ऑर्डर नाही. हे निकाल होईपर्यन्त प्रत्येक दिवशी १३ लाख रुपये भरायचे.

**रिटा शाह :-**

त्यांनी १३ लाख रुपये भरायचे. पण ज्यांना नवीन ठेका मिळाला आहे. त्यांनी काय करायचे?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

त्यांनी निर्णय होईपर्यंत तसेच रहायचे.

**रिटा शाह :-**

मग निर्णय तर वर्षानंतर होणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

आज निर्णय आहे. हेरिंग काल झालेले आहे. तीन-चार दिवस झाले हेच चालू आहे.

**अनंत पाटील :-**

उपआयुक्त महोदय, आपण आता मिरा भाईंदर नगरपालिकेमध्ये विधिवत कायदेशीर सल्लागार नेमलेले आहेत आणि हे सर्व नेमत असतांना याच्यामध्ये नगरपालिकेचे प्रशासक सर्व गोष्टीची पूर्तता न करतांना कुठे कमी पडलेले आहे. असे का घडलेले आहे. वास्तविक आपण यामध्ये सर्व गोष्टीची स्थायी समिती, महासभेने कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची व्यवस्था केलेली आहे. तर आपण कोर्टासमोर असे ढिले का पडलो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

ढिले पडलो हा मुद्दा पुर्णतः चुकीचा आहे त्याचे म्हणणे आणि आमचे म्हणणे हे कोर्टासमोर गेलेले आहे. महापालिका कायदेशीर कशी आहे हे आर्ग्युमेन्टमध्ये सिद्ध केलेले आहे आणि जे कोर्ट दोघांचे आर्ग्युमेन्ट ऐकून जो निर्णय देईल त्यानंतर एखाद्या वेळी विधी विभागाचा सल्लागार नेमला आणि एखाद्या केसमध्ये विरोधी निकाल गेला म्हणजे प्रशासन पूर्ण चुकीचे वागते असा त्याचा अर्थ नाही. जो निर्णय कोर्टात होईल तो आमच्या मते आम्ही आमची बाजू मांडलेली आहे. आमचे काही चुकलेले नाही हे आम्ही आर्ग्युमेंटमध्ये आणि रिटर्न स्टेटमेंन्टमध्ये दाखवून दिलेले आहे. आता कोर्टाचा निर्णय येणे बाकी आहे. कोर्टाच्या निर्णयानंतर बोलता येईल.

**अनंत पाटील :-**

कोर्टामध्ये जाण्याची त्रुटी आपण त्याच्यामध्ये ठेवली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

नाही. कोर्टामध्ये जाऊ नये अशी बंदी भारतातील कोणतीही संस्था घालू शकत नाही.

**रिटा शाह :-**

त्यापेक्षा जेव्हा अग्रवाल सहकार एजन्सी यांना जेव्हा टेन्डर मिळाले होते तेव्हा आपण कुठली पद्धत ॲक्सेप्ट केली होती.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हीच पद्धत.

**रिटा शाह :-**

मग आता त्याच पद्धतीने आपण त्यांना ठेका दिला तर आता दुसऱ्यांना त्याच पद्धतीने ठेका मिळाला मग आपण ते त्यामध्ये रिपोर्टींग केलेले आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सगळे रिपोर्टींग केलेले आहे. पण कुणाला महापालिकेविरुद्ध कोर्टात जाऊ नका अशी बंदी भारतामध्ये कोणीही करु शकत नाही. म्हणजे विधी सल्लागार नेमला म्हणजे हे की, कोर्टात जाता कामा नये असे नाही आहे.

**अनंत पाटील :-**

तसे म्हणायचा आमचा हेतू नाही आहे. परंतु, हे जे काही आपण ठेकेदार पद्धतीने चालू केलेले होते. ठेका देण्याचे ठरले असतांना अग्रवालांनी कुठल्या तरी एका पॉईन्टवर आपल्या नगरपालिकेला कुठेतरी हे ठेवलेले आहे आणि त्या संदर्भात त्याला कुठेतरी कोर्टाचा न्याय मिळाला आहे असा हेतू आहे. म्हणजे आपण त्याच्यात कमी पडलो आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

नाही, असे नाही. कमी पडलो असे म्हणता येणार नाही आणि प्रत्येकाला समोरच्या पार्टीला काही बेस नसले तरी देखील आम्हाला जसे कायदेशीर मुद्दे सांगून कोर्टात फेसिंग करायला चालते. महानगरपालिका कोणाविरुद्ध कोर्टात जात नाही. महापालिकेविरुद्ध लोक कोर्टात जातात आणि ती कोर्टात गेलेली लोक कशी चुकीची आहेत. आम्ही कोर्टापुढे आर्ग्युमेन्ट करणार. परंतु, कोर्टात जाऊन नये ही बंदी कुणाला घालता येणार नाही आणि तशा कुठल्याही मुद्यावर आम्ही जसे मोठे वकील नेमून आर्ग्युमेन्ट करतो तसे विरोधी पार्टीला किंवा कोर्टात जाणाऱ्या पार्टीला आता तुम्हांला उदाहरणच द्यायचे झाले तर जागेवर बांधकाम नसतांना जागेवर चार मजली होते. नंतर नगरपालिकेने तोडले हे प्रत्यक्षात खोटे आहे. परंतु, आम्ही ॲफिडेव्हीट घालतो. काही नाही, मोकळी जागा आहे. हे बघा फोटो. म्हणजे जाणाऱ्यांनासुद्धा बुद्धी आहे ना. त्यांचेदेखील वकिल आहेत. त्यांच्याकडेदेखील पैसा आहे. पण आपल्याला फेसिंग करावे लागते.

**धनराज अग्रवाल :-**

महापालिकेने आपले वकिल कोण नेमलेले आहेत?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

विजय साळवी.

**धनराज अग्रवाल :-**

ते कसे वकिल आहेत. एकतर असा तरी काही डाव असतो की, मुद्दाम जुने लोक नवीनने जास्त भरला. परत त्यांना काय शोर करायचा असेल तर त्यांनी कोर्टात जायचे आणि आपला वकिलच नरम पडत असेल तर परत जनतेला त्रास होणार अशी मला काही भिती वाटायला लागली आहे.

**रिटा शाह :-**

असे काय झाले तर पब्लिक आणि आम्ही रस्त्यावर येऊ.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

यामध्ये जरी वकिल असे म्हणतात असे काही होणार नाही. परंतु, शासकीय अधिकारी कमिशनर म्हणून ॲफिडेव्हीट चालताना नियम आणि कायदा आणि महापालिकेचे नुकसान होणार नाही. या पद्धतीनेच ॲफिडेव्हीट घालणे बंधनकारक आहे.

**धनराज अग्रवाल :-**

पालिकेचे नुकसान होणार नाही. जास्त भरतो. तर तो माणूस पहिले असे सांगत होता की, मला काही पैसे मिळतच नाही. मी नुकसानमध्ये आहे. ८ लाखामध्ये तो नुकसानमध्ये होता आणि १३ लाखामध्ये तो फायद्यामध्ये आहे. म्हणजे तो माणूसच खोटा आहे असे आम्हांला इथे वाटते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यावर मी काहीही बोलू शकत नाही.

**धनराज अग्रवाल :-**

माझे उत्तर द्या. तो कोर्टात गेला. कोर्टात जाऊ शकतो.

**मा. सभापती :-**

तो कोर्टात गेला. पण कोर्टात कोणीही जावू शकते.

**धनराज अग्रवाल :-**

माझा प्रश्न काय? तुम्ही कुठला वकिल नेमला? चांगला वकिल नेमला आहे की नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

नाही. असे होणार नाही. असा जाणूनबुजून लुज करण्याचा प्रयत्न होणार नाही.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, जकात संदर्भात सद्यस्थिती माहिती पाहिजे. ती मिळाली पाहिजे. हे जरुरीचे आहे. त्याच्यानंतर हे प्रकरण न्यायप्रविष्ट असतांना इतकी चर्चा करणे योग्य आहे का?

**मा. सभापती :-**

हा निर्णय उद्या माहिती पडेल. मग आपण उद्या ह्याच्यावर चर्चा करु. पुन्हा स्थायी समितीमध्ये काय करायचे? आपण त्याला स्थायी समितीमध्ये दिलेले आहे. स्थायी समितीमध्ये होकार दिलेला आहे. आता कोण काय करणार आहे? पुढच्या स्थायी समितीमध्ये आपण तो विषय पुन्हा मांडूया. पुढचा विषय घ्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

या उपर आपले जे टेन्डर मंजुर ज्याच्या नावाने केले आहे. त्यांनीसुद्धा नागपूरवरुन वकिल आणलेले आहेत आणि तोही मोठा आहे. म्हणजे नगरपालिकेची बाजू पण भक्कम केलेली आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, माझ्या हिशेबाने वकिल मोठा आणि छोटा नसतो. त्याने तिकडे काय फिड केले ते महत्वाचे असते. एखाद्या वकिलाला फिड करायचे नसेल तर गप्प बसतो.

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३ चे वाचन केले.)**

**प्र. सचिव (विजय पाटील) :-**

इतिवृत्तांताच्या कॉपीज सर्वांना दिलेल्या आहेत. पेजवाईस जर काही सुधारणा असतील तर पहा.

**आसिफ शेख :-**

पान क्र. ४७ ठराव क्र. २०४ झालेला. त्याचे पुढे काय झाले? कर्मचाऱ्यांना आपल्याला घ्यायचे होते ना. घेतले की नाही? आपण ठराव केलेला आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

तारीख काय आहे?

**प्र. सचिव (विजय पाटील) :-**

२९ जानेवारी ही तारीख आहे.

**आसिफ शेख :-**

नियुक्ती अगोदर दिली का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

आचारसंहिता असल्यामुळे टेन्डर काढून ठेका पद्धतीने त्यांना घेता आले नाही. मात्र, पुढील कालावधीमध्ये टेन्डर काढून ठेका पद्धतीने ते प्रशिक्षक नेमण्याबाबत कारवाई केली जाईल.

**आसिफ शेख :-**

ठरावामध्ये थोडी दुरुस्ती आहे. दुरुस्तीची जरा आपण नोंद घ्या. ठराव क्र. २०४ मा. स्थायी समिती सभापती यांनी क्रिडा स्पर्धामध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या खेळाडूंना मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर दोन टक्के आरक्षण प्रस्तावीत करणेसाठी पत्र दिले आहे. शासकीय, निमशासकीय सेवेत परस्पर सरळ सेवेने भरतीकरिता विविध घटकांसाठी जाहिर केलेल्या आरक्षणामध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर पदक विजेत्या खेळाडूंना आरक्षण ठेवल्याबद्दल समावेश नाही. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर खेळाडूंसाठी दोन टक्के आरक्षण प्रस्तावीत करणे तूर्त शक्य नसल्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील पदक प्रमाणपत्र विजेते खेळाडू व स्थानिक खेळाडू यांना गुणवत्तेनुसार प्राधान्य देण्यांत यावे म्हणजे अशा प्रकारे जे खेळाडू आहेत त्यांना तात्पुरती नेमणूक द्यावी. म्हणजे सदर खेळाडू हे मनपामार्फत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर मनपाचे खेळाडू सोबत खेळतील. त्यामुळे महानगरपालिकेचे नाव राज्यात तसेच देशात होणार असल्याने सहा महिन्यासाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्थानिक खेळाडूंना तात्पुरती प्रतिदिन रुपये १०५/- या दराने नियुक्ती देण्यांत यावी व येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे अशी त्यामध्ये दुरुस्ती.

**धनराज अग्रवाल :-**

दुरुस्तीमध्ये सुचक नाहीच आहे.

**आसिफ शेख :-**

सुचक नसला तरी अनुमोदक महत्वाचा असतो.

**धनराज अग्रवाल :-**

त्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यात फेरबदल करता येतो का? तो माणूसच नाही आहे.

**आसिफ शेख :-**

दुरुस्ती केली ना.

**धनराज अग्रवाल :-**

कसा प्रस्ताव मांडला होता आम्हांला काय माहिती.

**आसिफ शेख :-**

अनुमोदन दिल्याशिवाय ठराव मंजुर होऊ शकत नाही. सुचक राहू शकतो.

**धनराज अग्रवाल :-**

पण त्यावेळेला तुम्ही ह्याच्यात अनुमोदन दिलेले आहे. आता तुम्ही फेरबदल कसा करता.

**आसिफ शेख :-**

तुमचा स्थानिक लोकांना विरोध आहे का?

**धनराज अग्रवाल :-**

स्थानिक आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

स्थानिक या शब्दाचा अर्थ महाराष्ट्र जिल्हा होऊ शकत नाही किंवा गांव होऊ शकत नाही.

**आसिफ शेख :-**

असे कोण बोलले? आम्ही स्थानिकच बोललो. स्थानिक म्हणजे महाराष्ट्र. दुसरे काही बोललो नाही आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हे एक झाले. दुसरे म्हणजे प्रोसीडींग कायम करतांना काना, मात्रा, उकार तुमचा उद्देश काय कमी कसेल तेवढेच बोला. पूर्ण ठराव बदल होत नाही.

**आसिफ शेख :-**

पूर्ण ठराव बदल झालेला नाही. दुरुस्ती केलेली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यामध्ये आठ ओळी वाढीव झालेल्या आहेत. तुम्ही केलेल्या ठरावामध्ये चुकीचे लिहिलेले एवढीच दुरुस्ती होणार नवीन ठराव होणार नाही.

**आसिफ शेख :-**

सांगितलेले वाक्य आले नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तुम्ही दिलेलाच ठराव आम्ही घेतला आहे. काना, मात्रा, उकार चुकीचे काय आहे ते दाखवा.

**आसिफ शेख :-**

मला दुरुस्तीच करायची आहे म्हणून सांगतो. सभापती साहेब निर्णय घ्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तो एम.ए. झालेला आहे. तुमचा उद्देश नेमणूक करावी हा आहे. त्यामध्ये आले आहे. आता टेन्डर प्रसिद्धीकरण होईल आणि गुणवत्तेनुसार अर्ज मागवून घेऊन, मुलाखात घेऊन नेमणुक केली जाईल. त्यानंतर तुमचे प्रयोजन सुरु होईल.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, मान्य आहे का? निर्णय तुम्ही घ्यायचा आहे. तुम्ही सभापती आहात.

**जोजफ घोन्सालवीस :-**

निर्णयाचा इथे प्रश्नच येत नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

नियुक्ती झाल्यावर करा.

**आसिफ शेख :-**

ठिक आहे.

**प्र. सचिव (विजय पाटील) :-**

स्थायी समिती सभा दिनांक २६/०२/२००४ चे इतिवृत्तांत दिले आहे मी पेजवाईज जातो.

**आसिफ शेख :-**

दुरुस्तीसह मंजुर आहे.

**प्रकरण क्र. ३ :-**

दि. २९/०१/२००४, दि. २६/०२/२००४, रोजींचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ५ :-**

दि. २९/०१/२००४, दि. २६/०२/२००४ रोजींचे मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती. अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४ चे वाचन केले.)**

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर आहे.

**प्रकरण क्र. ४ :-**

संगणक चालक ठेका पद्धतीने नेमण्याबाबत.

**ठराव क्र. ६ :-**

महानगरपालिकेत यापुर्वीच डेटा एन्ट्रीसाठी संगणक चालक पुरविणे कामी (भांडार विभाग) टेंडर नोटीस काढण्यांत आली होती. त्यानुसार संगणक चालक पुरवठा करणेबाबत ठेका मे. ब्लू बर्डस सिस्टीम्स यांना मंजुर करण्यांत आला आहे. त्यानुसार प्रती दिन ७८/- याप्रमाणे एका संगणक चालकाचा दर मंजूर असून सदर ठेका मंजुरी दरम्यानच मा. सभापती, मा. सभागृह नेते व कर विभागात मिळून तीन संगणक चालक याची तातडीने कामाची आवश्यकता असल्यामुळे नेमणुक केली आहे. तरी सदर तीन संगणक चालक यांच्या केलेल्या नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत असून आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच सदर तीन संगणक चालक यांचे देयक हे मे. ब्लु बर्डस सिस्टीम्स यांच्या कडूनच देण्यात मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह. अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वेती.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५ चे वाचन केले.)**

**प्र. सचिव (विजय पाटील) :-**

आपल्याला गोषवारा दिलेला आहे.

**आसिफ शेख :-**

पाच नंबरचे जे सोनम बिल्डर आहे. त्याच्याऐवजी सालासर बिल्डर.

**चंद्रकांत वैती :-**

सालासर बिल्डर का? या गोष्टीकडून वारंवार मागणी केली. आपण त्यांना तसे पत्र दिलेले आहे. ऑर्डर दिलेली आहे आणि असे कसे बदलता सालासर बिल्डर म्हणून. यासाठी कारंजे लावायचे आपण प्लॅन पण मंजुर करुन घेतला. त्यांच्याशी चार महिन्यापासून त्या विषयी पत्रव्यवहार चालू आहे. असे कसे आपण बदलणार? सालासरला दुसरे कुठले तरी द्या. त्याने कारंजे लावावे म्हणून कमिशनर

साहेबांकडे त्या विषयी चर्चा झाली. आता पुन्हा १२ तारखेला बोलवलं होत आणि दुसऱ्या कोणाची मागणी देखील नाही. याच्या आपण मागण्या केल्या होत्या. भाईंदर पश्चिमेचे घ्या. पोलिस स्टेशनसमोर आहे. पुन्हा ते फ्लाय ओव्हर ब्रिज उतरल्यानंतर त्या बाजूला तिथेही आहे.

**धनराज अग्रवाल :-**

तिथे झालेले आहे.

**रिटा शाह :-**

तिथे लवकरात लवकर करायला पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

असे तिकडे अपघात होतात. आपण अजून अलाइनमेन्ट पण दिलेली नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हे ॲड कर. भाईंदर पोलिस स्टेशन समोर तो ओव्हर ब्रिज उतरल्यानंतर.

**चंद्रकांत वैती :-**

पोलिस स्टेशनसमोर आणि फ्लाय ओव्हर ब्रिज उतरल्यानंतर त्याची मागणी करुन घ्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

अगोदरच्या तारखेचा आणू द्या.

**दिपक खांबित :-**

सदरचा प्रस्ताव दिलेला आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, विविध ठिकाणी वाहतुक बेट बांधण्याची आपण मंजुरी दिलेली आहे. हा विषय माझ्या मताने दोन किंवा तीन वेळा स्थायी समितीमध्ये आला होता आणि विविध नावाने तो प्रत्येक वेळी येतो. म्हणजे आपण कुठेतरी याची जाहिरात करतो का? हे कसे काय आपण ह्यांना दिलेले आहे. जाहिरात केलेली आहे का? त्याचे एस्टीमेट दाखविले आहे. त्याचे आपण डिझाइन दिलेली आहे का? आणि ही जी वाहतुक शाखा आहे. त्याची मिटींग झालेली आहे. पण आता जे बेट तिकडे लिहिलेले आहे त्याबद्दल आम्ही मागे विचारले असतांना असे सांगितले ते बेट होऊ शकत नाही. साठ फुट व नव्वद फुट मध्ये मी एक विचारणा केली होती की, आम्हांला एक बेट पाहिजे होते. तर तुम्ही सांगितले की, वाहतुकवाले तिकडे नाही सांगतात. आता परवानगी दिली. पण त्या टाईमला नाही सांगितले होते.

**चंद्रकांत वैती :-**

ट्रॅफिक पोलिसांनी परवानगी दिली.

**दिपक खांबित :-**

त्यावेळी नाही बोलले होते. पण आता फाटक बंद झाले म्हणून त्यांनी परवानगी दिली.

**धनराज अग्रवाल :-**

आता पोलिस स्टेशनमध्ये पण कमी जागा होती आणि आता तुम्ही सांगता बांधू शकतात. पण त्यामध्ये काही नियम धोरण आहे की नाही? पहिले नव्हते. आता झाले नियम बदलले आहे का?

**दिपक खांबित :-**

आम्ही कुठे बोललो ते बोलले.

**धनराज अग्रवाल :-**

पहिले इकडे बोलले होती की, जिथे कमी जागा आहे. तिथे वाहतुक बेट होऊ शकत नाही. तुमची डिझाइन तुम्ही कमी केली असेल. आता काही खर्च कमी केला असेल तर तसे आम्हांला सांगा आणि कुठल्या पेपरमध्ये आपण दिलेले आहे. कोणाला विचारुन तुम्ही असे केले? स्थायी समितीमध्ये काही विषय आला नाही. पहिला विषय आला होता आणि तुम्ही दुसरे नांव दिले होते. आता परत दुसरे नांव आले, तर हे नांव कसे काय आले?

**दिपक खांबित :-**

ज्यांचे नवीन अर्ज आले ते घेतले.

**धनराज अग्रवाल :-**

अर्ज कसे आले? तुम्ही जाहिरात दिली होती ना?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हो, जाहिरात दोन वर्षापुर्वी दिली होती.

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीचा ठराव माझ्याकडे आहे.

**चंद्रकांत वैती :-**

हे प्रकरण दोन वर्षापासून प्रलंबित आहे. त्या विषयी उपमहापौरांनी दहा वेळा विचारणा केली.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यांचे समाधान करेपर्यंन्त मी उत्तर देतो आणि मग नंतर सांगा.

**आसिफ शेख :-**

साहेब, अडचण काय आहे? मंजूर करुन टाका.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

यापुर्वी वेगवेगळ्या ठिकाणाचे टेन्डर पद्धतीने देण्यासाठी आयलॅन्डचे टेन्डर काढले होते. आयलॅन्डचे टेन्डर काढून टेन्डर मंजूर होते. त्यावेळेला नगरपालिकेला ७०-८० लाखाचा खर्च येणार होता आणि यापुढे मेन्टेनन्ससुद्धा आपल्याला करावे लागणार होते. म्हणून आपण ते रद्द केले आणि रद्द करुन त्यांचे त्यांनीच मेन्टेनन्स करायचे. जाहिरात मोफत आणि त्यांनीच देखरेख करुन त्यांनीच नगरपालिकेला मोफत बांधून देण्याच्या या अटीवर पेपर प्रसिद्धीकरण करण्यांत आले. त्यावेळेला त्याचे अर्ज आले. अर्ज आल्यानंतर अर्ज कोणकोणते मंजुर करायचे याबाबत आम्ही पोलिस स्टेशनला पत्रव्यवहार केला. पोलिसांना पत्रव्यवहार केल्यानंतर वाहतुकीला काय ट्रॅफिकचे जे तज्ञ आहेत त्यांनी स्वतः साईट व्हिजीट केली आणि व्हिजीट केल्यानंतर जे जे पॉईन्ट त्यांना मंजुर करण्यासारखे की, आयलॅन्ड करुनदेखील अपघात होणार नाहीत याची दक्षता घेऊन पोलिस डिपार्टमेन्टने मंजुरी आम्हांला आता दिली. म्हणून हा विषय मंजुरीसाठी आपल्यापुढे ठेवलेला आहे. प्रत्यक्षात ज्या ठिकाणी पुर्वी जे मंजुरीसाठी पाठवित असतांना रेल्वे फाटकातून वाहतुक चालू होती. त्यानंतर रेल्वे फाटक बंद झाल्यानंतर आयलॅन्डची मंजुरी मिळेल असे त्यांनी सांगितले. पुर्वी ओव्हरब्रिज चालू नव्हता. म्हणून ते म्हणाले वाहतुक संपूर्ण इथेच असल्यामुळे आयलॅन्ड करुन अपघात होतील आणि वाहतुक सुरळीत होणार नाही. मात्र, ७५ टक्के वाहतुक तिकडून होणार असल्यामुळे इथे आयलॅन्ड बनविता येईल. म्हणून एरिया कमी करुन त्यांनी मंजुरी दिली आणि तीही मंजुरी मिळेल. यामध्ये भाईंदर पोलिस स्टेशनचा चौक धरलेला नाही. परंतु, त्याच्याशी चर्चा करतांना ज्यावेळेला रेल्वे फाटक चालू होते त्यावेळेला परवानगी मिळणार नाही. तिथे आयलॅन्ड बनविता येणार नाही म्हणून सांगितले होते. मात्र चर्चा अंती असे त्यांनी सांगितले. आता रेल्वे फाटक बंद झालेले आहे. ओव्हरब्रिज सुरु झाला असल्यामुळे वाहतुक कमी असल्यामुळे आम्ही एरिया कमी करुन तुम्हांला आयलॅन्डला परवानगी देऊ. ती मागायची असेल तर मागा. ती परवानगी अजूनही मागितली नाही. आत ज्या आयलॅन्डसाठी परवानगी आलेली आहे तीच आपल्यापुढे ठेवलेली आहे. यात नवीन अर्जदार असा कोणी नाही.

**धनराज अग्रवाल :-**

यामध्ये नवीन अर्जदार आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कुठला?

**धनराज अग्रवाल :-**

पहिले आपण स्टेशनवर पण नाही सांगितले होते. स्टेशनवर भाईंदर वेस्टमध्ये तिथे पण जागा नाही असे सांगितले होते. आता स्टेशनवर पण आलेले आहे.

**दिपक खांबित :-**

तुम्ही फक्त ४/१/०१ चा ठराव बघा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

४/१/०१ चा ठराव बघा. त्या ठरावामध्ये नाव बदल असेल तर आम्हांला सांगा.

**दिपक खांबित :-**

स्टॅंडिंग मिटींगमध्ये असा ठराव केला आहे की, इच्छूक संस्थांना कामे देण्या व्यतिरिक्त पण ठराव केला आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

या व्यतिरिक्त कोण आले तरी त्यांना द्या म्हणून ठराव आहे. थोडे आणायची आवश्यकतासुद्धा नाही आहे.

**धनराज अग्रवाल :-**

बरोबर आहे. पण तुम्ही खर्च कमी केले असे आम्हांला कसे माहिती पडेल. आता तुम्ही सांगता खर्च कमी केला आहे.

**दिपक खांबित :-**

आपला खर्चाशी संबंधच नाही आहे. आपण खर्च करत नाही.

**धनराज अग्रवाल :-**

ते एस्टिमेट कमी झाले ना. आधीचे जे मला २ लाख रुपये लावायचे आहे तिथे पहिले एस्टीमेट चारचे होते. मग मी कसे लावणार?

**दिपक खांबित :-**

एस्टीमेट कमी केले नाही.

**धनराज अग्रवाल :-**

आता साहेबांनी सांगितले एस्टीमेट कमी झालेले आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

एस्टीमेट भाईंदर पोलिस स्टेशनची अजूनही मंजुरी मागितली आहे. प्लॅनही आलेले नाही. मिळेल म्हणून सांगितले आहे. याबाबत मी चर्चाच केलेली नाही. ही मंजुरी पोलिस स्टेशनकडून मिळाली आणि जैसे थे मंजुरी मिळाली. मी भाईंदर पोलिस स्टेशनच्या समोरचे एरिया कमी होईल आणि वाहतुक ओव्हर ब्रिजवरुन सुरु होईल.

**धनराज अग्रवाल :-**

कमी होईल असे तुम्ही सांगितले.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

नाही. परवानगीच मागितलेली नाही.

**धनराज अग्रवाल :-**

दोन्ही ठिकाणी तुम्ही सांगितले कमी होणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कमी होणार आहे असे तुम्हांला का सांगितले कारण यापुर्वी मागची स्थायी समिती, नगरपालिका असतांना महापालिकेच्या खर्चाने आयलँन्ड बनवायचे म्हणून ७०-८० लाखाचे टेन्डर काढले होते. ते रद्द केले.

**धनराज अग्रवाल :-**

ते रद्द झाले. त्याच्यानंतर आपण टेन्डर प्रसिद्धी दिली. प्रसिद्धी दिल्यानंतर आपल्याकडे विविध लोकांचे अर्ज आले.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यामध्ये २०-२५ होते.

**धनराज अग्रवाल :-**

त्याच्यानंतर त्यावेळेला हा गेट बनणार नाही असे माहिती पडले होते. जास्त खर्चाचे जास्त लांब, जास्त रुंद बनत नाहीत. त्याच्यानंतर जर कमी एस्टीमेटचे आणि कमी लांबी-रुंदीचे जर नक्की केले तर त्यावेळेला तुम्हांला परत प्रसिद्धी दिली पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

म्हणजे या पॉईन्टला यांना न देता परत प्रसिद्धीकरण करायचे. आता मोफत बांधून देणार. बंदोबस्त ते करणार.

**धनराज अग्रवाल :-**

दुसरेपण बांधून देतात ना.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तुम्हांला दुसरे कोण बांधून देणार असतील त्यांची तुम्ही नांव सांगा. आम्ही दुसरे देतो. आता हेच करायला पाच वर्षे गेली. परत आयलॅन्ड केव्हा होणार?

**चंद्रकांत वैती :-**

रोज अपघात होतात. आयलॅन्ड होणे जरुरीचे आहे. ट्रॅफिक अलाइनमेंन्ट चेंज करण्यासाठी आपण दिलेले आहे.

**आसिफ शेख :-**

अडचण काय आहे?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

याचे नव्याने २००० साली एक टेन्डर काढले होते.

**धनराज अग्रवाल :-**

ती प्रोसीजर चुकीची असेल तर मी तुम्हांला नुसते विचारतो आहे. तुम्ही असे कशाला सांगता. तुम्ही अडकवता का? तुम्ही १०-१० वर्षे करिता नाही मग काय होते?

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल तुम्ही काम अडकवता म्हणून मी बोललो नाही किंवा तसा विषय नाही. मी काय सांगितले की, रोजच्या रोज अपघात होत असतात आणि ट्रॅफिक आयलॅन्ड जर झाले, ट्रॅफिक अलाइनमेन्ट चेंज करण्यासाठी आपण सगळी तयारी केली आहे. याच्याविषयी आपण मागच्या सभेत ठराव पास केलेला आहे आणि मिरा रोडमध्ये बघा कशी परिस्थिती आहे.

**धनराज अग्रवाल :-**

एक विचारतो की, आता कुठे-कुठे तुम्हांला आयलॅन्ड करायचे आहे.

**मा. सभापती :-**

आपको जो जगह चाहिये वो बताईये।

**दिपक खांबित :-**

साहेब, हे सोडून तुम्हांला बोलतो. दोन जागा आहेत. एक भाईंदर पश्चिम पोलिस स्टेशन आहे. त्याच्या इथून ओव्हरब्रिजवरुन आपण खाली उतरलो की, टेम्बा रोडला वळतो त्यापुढे जो संपूर्ण चौक आहे तो एक चौक आहे.

**धनराज अग्रवाल :-**

तो चौक यामध्ये आलेला आहे.

**दिपक खांबित :-**

नाही आला आहे. जो आलेला आहे तो छोटासा आलेला आहे. पुढचा जो मोठा आहे जो रस्ता डिव्हाईड होतो त्याच्यामधला चौक.

**रिटा शाह :-**

साहेब, एक महत्वाचे म्हणजे ओव्हरब्रिज उतरल्यानंतर आपण ईस्टमध्ये येतो ते फार महत्वाचे आहे. तिथे अर्जंट बनवायला पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

लोक भरणार आहेत. सध्या मी बांधले त्याचे इन्स्ट्रूमेंट मी माझेपुरता करणार की, दुसऱ्याला पण लावून देणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

स्वतःचे लिहून घ्या.

**धनराज अग्रवाल :-**

मेन्टेन ते सर्व करणार. साहेब, आता जे झाड लावलेले आहे त्याला पाणीसुद्धा आपली माणसं पाजतात. तुम्ही सांगता मेन्टेनन्स ते करणार. आतापण मी बघितले झाडावर टँकर आपलाच चालतो आणि तिथे आपले पाणी जाते. नंतर त्याच्याकडून असे होऊ नये.

**मा. सभापती :-**

आता आपण पास करतो ना.

**आसिफ शेख :-**

झाडांना पाणी दिलेच पाहिजे ना.

**रिटा शाह :-**

ते मंजुर आहे का? ओव्हरब्रिज उतरतांना ईस्टजवळ नयानगरला जायला रस्ता आहे तिकडे जरुरीचे आहे.

**धनराज अग्रवाल :-**

झाडाला लावलेल्या ठेकेदारानेच पाणी पाजले पाहिजे. आपण कशाला पाणी पाजतो. मग आपण पाणी दिले तर त्याचे पैसे कापायला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

ती झाडे पालिकेने लावलेली आहेत ना.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

एक दिवस काय झाले होते? एक दिवस पाणी भरणे वेळेवर झाले नाही म्हणून नगरपालिकेचे दोन टँकर झाडे वाळू नयेत म्हणून गेले होते. पण ठेकेदारच पाणी घालतो.

**धनराज अग्रवाल :-**

एक दिवस घालून दिले आणि मग तुम्ही बोलता.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

नाही. एकच दिवस म्हणजे झाडे वाळू नयेत म्हणून.

**धनराज अग्रवाल :-**

एक दिवस झाडाला पाणी घातले नाही तर झाडे मरत नाहीत. तुम्हांलाही माहिती आहे, मलादेखील माहिती आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

यापुढे ती दक्षता घेऊ. ठेकेदारानेच झाडांना पाणी घालायचे आहे. किती टँकर घ्यायचे तेवढ्या टँकरचे बिल त्याच्या ह्याच्यातून कट करा. जेवढे टँकर आहेत तेवढे मोजून घ्या आणि तेवढ्या टँकरचे बिल त्याच्या बिलातून कट करुन घ्या.

**प्रकरण क्र. ५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी वाहतूक बेट बांधणे कामी मंजूरी देणे.

**ठराव क्र. ७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी चौकात वाहतूक बेट स्वखर्चाने विकसित करुन त्याची देखभाल व दुरुस्ती करणे कामी प्रशासकीय ठराव व मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०१/२००३ प्रकरण क्र. ७८ अन्वये मंजूर ठरावानुसार विविध संस्थांना कामे देण्यात आलेली होती. सदर कामी वाहतूक नियंत्रण, वाहतूक शाखा ठाणे यांची परवानगी आवश्यक असल्याने पाठपुरावा केल्यानंतर सदर विभागाकडून वाहतूक बेटे बांधण्यास नाहरकत दाखला प्राप्त झालेला आहे. ह्या अनुशंगाने यापूर्वी वाहतूक बेटे बांधणे कामी पत्रव्यवहार केलेल्या संस्था व नव्याने मागणी केलेल्या संस्था यांची मा. आयुक्त यांच्या दाजनात दि. ०६/०५/०४ रोजी बैठक आयोजित केलेली होती सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार व मागणीनुसार खालील संस्थांनी वाहतूक बेटे बांधणे कामी महानगरपालिकेकडे परवानगी मागितलेली आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | ठिकाण |
|---|---|---|
| १. | अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज लि. | अ) छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (एस. के. स्टोन)<br>ब) शितल नगर जंक्शन समोर<br>क) मिरा रोड विभागीय कार्यालय समोर<br>ड) मिरा रोड कृणाल शॉपींग सेंटर समोर<br>ई) मिरा रोड हैदरी चौक समोर |
| २. | मे. सुरेश डी. शहा | भाईंदर (प.) जैन मंदिर जंक्शन |
| ३. | प्रजापती ब्रम्हकुमारी इश्वरीय विद्यालय | अ) भाईंदर (प.) क्षीरसागर हॉटेल समोर |
| ४. | डॉ. राजीव बी. अगरवाल, कस्तुरी मेमोरीयल हॉस्पीटल | भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन समोर |
| ५. | मे. सोनम बिल्डर्स | भाईंदर पूर्व उड्डाणपूल जंक्शन |
| ६. | मे. ओस्वाल बिल्डर्स | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (शिवार गार्डन जंक्शन) |
| ७. | मे. पाली बिच रिसोर्ट | उड्डाणपूल उतरल्यावर टॉवर पर्यंत, भाईंदर (प.) |
| ८. | मे. श्रीजी कन्स्ट्रक्शन | उड्डाणपूल रस्ता टेंभा हॉस्पीटल रस्ता जंक्शन |
| ९. | मे. इस्ट वेस्ट फाउंडेशन | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (रेल्वे फाटक, भाईंदर पूर्व साईबाबा मंदिर जंक्शन) |
| १०. | मे. रश्मी बिल्डर्स | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (कनकीया पोलिस स्टेशन जंक्शन) |
| ११. | मे. ॲक्टीव ट्रायो | अ) भाईंदर पूर्व उड्डाणपूल जंक्शन लोटा पार्कस रस्त्या कॉर्नरची गार्डन<br>ब) छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (सिल्व्हर पार्क जंक्शन) |

| अ.क्र. | संस्थेचे नांव | ठिकाण |
|---|---|---|
| | | क) छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (साईबाबा नगर जंक्शन) |

वरील पैकी अ.क्र. १ ते ४ पर्यंत संस्थांना यापूर्वी परवानगी देण्यात आलेली आहे. तरी वरील मागणीनुसार अ.क्र. ५ ते ११ या संस्थांना करारनामे करुन महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आराखड्यानुसार स्वखर्चाने वाहतूक बेट बांधणे, त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे व त्यावर जाहीरात करणे कामी परवानगी देण्यांत येत आहे. तसेच यापूढे सुद्धा विविध ठिकाणी वाहतूक बेट बांधणे कामी मा. आयुक्त यांनी मागणीनुसार खाजगी संस्था व व्यक्ती यांना परवानगी देण्यांत यावी असा ठराव पारीत करीत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती. अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६ चे वाचन केले.)**

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, हे आपल्याकडे कामाला आहेत का?

**गोविंद परब :-**

ट्रेनिंगला आपण त्यांना अजून घेतलेले नाही. शासनाने त्यांच्यासाठी विविध कोर्स केलेले आहेत. एक वर्षासाठी ट्रेनिंगला आपल्याकडे पाठविले आहे. ते आपल्याकडे ट्रेनिंग घेतल्यानंतर नाममात्र रु. ८५०/- स्टायपन्ड.

**धनराज अग्रवाल :-**

ते आपले कर्मचारी नाहीत. तिकडून आलेलेच आहेत.

**गोविंद परब :-**

ते पाठविलेले आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

अप्रॅन्टीशिप ॲक्ट म्हणून ही तरतुद आहे. त्या तरतुदीमध्ये काही लोकांना प्रशिक्षण देण्याचे काम प्रत्येक वेळेला म्हणजे गावातील असो किंवा बाहेरची असो. त्याच्या दोन लोक, पाच लोक असे कम्पलशन आहे. त्या ॲक्टप्रमाणे आपण त्यांना स्टायपन्ड देऊन प्रशिक्षण द्यायचे आहे. त्यानंतर हे त्यांना शासनाने बंधनकारक केलेले आहे की, जो प्लंबिंग कोर्स आहे ८२० आणि ९४० ॲप्रॅन्टीशिप ॲक्ट म्हणून प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला त्यांना स्टायपन्ड देऊन प्रशिक्षण देण्याचे बंधनकारक केलेले आहे. त्याप्रमाणे आपल्याकडे जे एक वर्षासाठी तीन प्रशिक्षक द्यायचे आहेत. एक वर्ष ट्रेनिंग द्यायचे आणि त्या बदल्यात त्यांना पहिले रु. ८२०/- स्टायपन्ड पर मन्थ द्यायचा आहे. हे कम्पलशन केलेले आहे. ट्रेनिंग देऊन म्हणजे त्यांचे पुढे त्यांनी उपजिवीकेचे साधन निर्माण करावे म्हणून अप्रॅन्टीशिप ॲक्टप्रमाणे केलेले आहे.

**अशोक पाटील :-**

आपल्याकडे त्यांना स्पेशल ट्रेनिंग मिळेल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

दोन वर्षे आहेत. पहिल्या वर्षासाठी रु. ८२०/-

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

दोन वर्षे पहिले सांगितले होते. पण आता एकच वर्ष.

**चंद्रकांत वैती :-**

मग ठरावात तसा बदल करुन घ्या. एक वर्षाचे त्यांचे हे आहे. आपण दोन वर्षे लिहून घेतले आहे आणि त्याच्या पुढचे कलम आहे की, प्रशिक्षणार्थीला जर गंभीर दुखापत झाली तर संपूर्ण भरपाई महानगरपालिकेला असेल. त्याला दुखापत होऊ नये म्हणून काळजी पण घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पाण्याचे मीटर्स बंद असतात. त्यामुळे आपण हे सरासरी बिल मारतो. त्याच्यामुळे आपल्या नगरपालिकेचे पण नुकसान होते.

**मा. सभापती :-**

नगरपालिकेचे नुकसान होत नाही खुप कमाई होते.

**जोजफ घोन्सालवीस :-**

खुप कमाई होते. पण आपल्या पब्लिकला जे आपण त्रस्त करतो हे बरे दिसत नाही. कार्यशाळा उघडावी अशी कधीपासून मागणी आहे. तर त्याचे काय झाले?

**धनराज अग्रवाल :-**

हा विषय मुद्दाम पास झालेला आहे. दोन तीन वेळा नगरपालिकेपासून चालू आहे. पण इथे जाणूनबुजून कार्यशाळा करत नाहीत की, काय तेच मला समजत नाही. मी सांगतो, दहा वर्षापासून होत नाही. ते का होत नाही? नगरपालिकेत पास झाले होते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

प्लंबर ट्रेनिंग देण्याचा विषय आहे नाही. ते अधिकारी पण उपस्थित नाही आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

त्या विषयात योग्य ती माहिती घेऊन सभेमध्ये आणला पाहिजे. याच्यापुढे सभापती साहेब, या विषयात आपण लक्ष घातले पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण एक सभापतींना पत्र द्या. तो विषय घ्या आणि मग चर्चा करा. आता प्लंबर प्रशिक्षण देण्याच्या विषयांत पाण्याचे मीटर कुठे आले?

**प्रकरण क्र. ६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील डायरेक्टर वोकेशनल एज्युकेशन ट्रेनिंग सेंटर महाराष्ट्र मुंबई यांचे कडून पाठविणेंत आलेले प्लंबर यांना प्रशिक्षण देणे बाबत.

**ठराव क्र. ८ :-**

डेप्युटी ॲप्रेटीसशिप ॲडव्हायझर डायरेक्टर वोकेशनल एज्युकेशन अँड ट्रेनिंग महाराष्ट राज्य, मुंबई-१ यांचे दि. १५/३/०४ व २३/३/०४ चे पत्राप्रमाणे (१) संतोष कमलाकर जगताप, (२) कुंदन बळीराम मोरे, (३) स्वप्नील दत्तात्रेय पाटील, (४) भावेश अमृत राऊत यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेत प्लंबर (नळ कारागीर) पदाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण घेणेसाठी पाठविणेत आले आहे. ॲप्रेटीस ॲक्ट १९६१ चे अंतर्गत असे प्रशिक्षण देणे बंधनकारक आहे.

प्रशिक्षणार्थींना खालील प्रमाणे विद्यावेतन व रजा देय असेल.

४. **कालावधी आणि स्टायपेंड (विद्यावेतन)** :- प्रत्येक प्रशिक्षणार्थींचा कालावधी एक वर्षाचा असुन, पहिल्या वर्षीच्या प्रशिक्षण कालावधीकरीता प्रत्येक प्रशिक्षणार्थीला दर महा रु. ८२०/-स्टायपेंड (विद्यावेतन) मिरा भाईंदर महानगरपालिकेला द्यावे लागणार आहे.

५. **मान्य केलेल्या सुट्ट्या** :- महानगरपालिकेकडे प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींना खालील प्रमाणे रजा देय आहे.

 १) किरकोळ रजा - ८ दिवस - एका वर्षीच्या कालावधीकरिता. (जाने. ते डिसेंबर)
 २) वैद्यकिय रजा - १५ दिवस एक वर्षाच्या कालवधीकरिता. (जाने. ते डिसेंबर)
 ३) इतर रजा - (१० दिवस मिळणाऱ्या रजा स्टायपेंड व्यतिरिक्त) (जाने. ते डिसेंबर)

६. **प्रशिक्षणार्थींची नुकसान भरपाई** :- एखाद्या प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षण ठिकाणी किंवा प्रशिक्षण कालावधीमध्ये एखादी दुःखापत किंवा अपघात झाला असता, १९२३ च्या कामगार नुकसान भरपाई कायद्या अंतर्गत त्या प्रशिक्षणार्थीला संपूर्ण भरपाई मिरा भाईंदर महानगरपालिकेस देणे आवश्यक राहील.

वरीलप्रमाणे प्रशिक्षणार्थींना मिरा भाईंदर महानगरपालिकेत प्लंबर पदाच्या प्रशिक्षणासाठी ठेवून घेणेस व प्रशिक्षण कालावधीत त्यांना मंजूर दराने विद्यावेतन तसेच रजा इ. देण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येते.

**सुचक :- श्री. आसिफ शेख. अनुमोदन :- श्री. हरेश गावंड.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७ चे वाचन केले.)**

**अशोक पाटील :-**

विविध ठिकाणी म्हणजे कुठे?

**चंद्रकांत वैती :-**

चार ठिकाणी जागा मेन्शन केल्या. एस्सेल वर्ल्डला बांधायला दिले. त्याचे डिझाइन म्युनिसिपालिटी देणार होती.

**दिपक खांबित :-**

मी फोटो दाखवितो कसे बांधाणार ते.

**चंद्रकांत वैती :-**

सर्व सदस्यांना फोटो दाखवा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ठाणे महापालिकेमध्ये उंच अँगलवर हिरवे बोर्ड आहेत. म्हणजे हे इकडे कोण कुठल्या बाजूला चालले आहेत. डाव्या हाताने कुठल्या बाजूला जायचे उजव्या हाताने कुठल्या बाजूला जायचे आहे त्याचा खर्च महापालिकेला फार मोठ्या प्रमाणात येणार होता. पण या लोकांनी जर बांधले आणि कुठल्या तरी कोपऱ्यावर त्याची जाहिरात केली तर आता जर भाईंदर पोलिस स्टेशनपाशी बोर्ड आला असे गृहित धरले तर इकडे रेल्वे स्टेशन आहे आणि इकडे उत्तन, एस्सेल वर्ल्ड आहे, डोंगरी आहे. ह्या सगळ्या गांवांची नांवे येऊन बाण दाखविणे आणि इकडे शाळा, कॉलेज आहेत, रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टँड आहे हे जे बोर्ड आहेत हे महापालिकेने करण्याऐवजी त्यांनी एका कोपऱ्यावर त्याची जाहिरात करावी आणि हा सर्व खर्च त्यांनी करावा. यासाठी हा विषय आणलेला आहे.

**आसिफ शेख :-**

त्यामध्ये महापालिकेचा खर्च नाही ना.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

नाही.

**आसिफ शेख :-**

म्हणजे वाहतुक बेटप्रमाणे देणार मग ठिक आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

गाडी जर आली तर लाईट पडल्यानंतरसुद्धा ते अक्षर दिसावे.

**धनराज अग्रवाल :-**

फॉर्म भरणार. तुम्ही घाई कशाला करता?

**आसिफ शेख :-**

फॉर्म भरला पाहिजे. त्यांना शुभेच्छा द्यायला पाहिजे. मंजुर आहे.

**धनराज अग्रवाल :-**

याच्यात काही टर्म किंवा कंन्डिशन आहेत का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

जे बांधणार आहेत त्यांची तेवढीच जाहिरात करतील. बाहेरची जाहिरात घ्यायला त्यांना अलाऊड करणार नाही.

**धनराज अग्रवाल :-**

लाईट वगैरे आपण देणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

इतक्या मोठ्या प्रमाणात खर्च करणार म्हणजे कुठल्या तरी कोपऱ्यात त्याला जाहिरात करायला द्यायला पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

मुदत किती देतो? त्या कमानीची आपण मुदत काय देतो?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कायम स्वरुपी.

**धनराज अग्रवाल :-**

आता मी तुम्हांला सांगतो, पाणपोईची मी परमिशन घेतली. मला तिथे खाली लिहिलेले होते ११ महिन्याची मुदत, मग पाणपोई परत पाडायची.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

पाणपोई देताना अट घालू नये. झाली असेल तर ती चुक आपण परत एकदा करेक्शन करु.

**धनराज अग्रवाल :-**

ह्याला पण ११ महिन्यात पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

अकरा महिन्यात एवढे इन्व्हेस्टमेन्ट कोण करणार? पाणपोईचा विषय याच्याशी निगडीत नाही. पाणपोईची अट चालू नये हे मी मान्य करतो.

**धनराज अग्रवाल :-**

मग तुम्ही अकरा महिने कशाला टाकता?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

हे चुकीचे आहे.

**आसिफ शेख :-**

कामयस्वरुपी पाणपोई देऊन टाका.

**रिटा शाह :-**

साहेब, काही पण उत्तर देताना पहिला विचार करा. पाणपोई असू द्या की, शाळा असू द्या की, कॉलेज असू द्या, काहीही असू दे. पण जेव्हा तुम्ही पाणपोईची किंवा कुठल्याही बांधकामाची परवानगी देतांना ती एखाद्या वेळी गव्हर्नमेंट जागा किंवा जागेचा वादविवाद, रोड मार्जिनमध्ये गेली. मग त्यावेळी तुम्ही काय करणार? कायमची दिल्यानंतर.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

मॅडम तुमचा मुद्दा माझ्या लक्षात आला की, आम्ही अट घालतांना मुदतीची अट न घालता ती जागा महापालिकेला किंवा शासकीय कामासाठी लागल्यास त्यावेळेला काढून टाकायच्या अटीवर महापालिकेला किंवा शासनाला ही जागा सार्वजनिक कामासाठी लागत असेल त्या वेळेला काढून घेण्याच्या अटीवर.

**प्रकरण क्र. ७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी B.O.T. तत्वावर कमानी बांधणे बाबात विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वे वरील उड्डाणपूल वाहतुकीस खुला करण्यात आलेला आहे. सदर उड्डाणूलावर दोन्ही बाजूस पूर्ण रुंदीच्या दिशादर्शक कमानी स्वखर्चाने बांधण्याबाबत श्री. विजय मांडवकर यांनी महानगरपालिकेकडे परवानगी मागितलेली आहे. कल्याण डोंबीवली महानगरपालिकेने सुद्धा उड्डाणपूलावर दिशादर्शक कमानी उभ्या केलेल्या आहेत. तसेच एस्सेल वर्ल्ड यांनी सुद्धा खालील रस्त्यावर ठाणे महानगरपालिकेने उभारलेल्या कमानी प्रमाणे दिशादर्शक कमानी बांधण्याबाबत परवानगी मागितलेली आहे.

१. भाईंदर (प.) उत्तन रोड (सुभाषचंद्र बोस मैदान पाण्याच्या टाकी शेजारी)

२. छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (गोल्डन नेस्ट समोर)

३. छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (एस. के. स्टोन जवळ)

४. छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (सिल्व्हर पार्क जवळ

वरील ठिकाणी एस्सेल वर्ल्ड स्वखर्चाने महानगरपालिकेकडून मंजूर केलेल्या डीझाईन नुसार व नावासहीत दिशदर्शक कमानी उभारुन त्याची देखभाल सुद्धा स्वतः करणार आहे.

वरील प्रमाणे कमानी उभारुन त्यावरील काही भागात जाहीरात करणार आहेत, व स्वतः खर्च करणार असल्याने महानगरपालिकेच्या निधिची बचत होणार आहे. तरी मागणीनुसार कमानी उभारण्याबाबत परवानगी देण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारे कमानी बाबत महानगरपालिकेकडे प्रस्ताव आल्यास मा. आयुक्त यांनी सदर प्रस्ताव तपासून खाजगी संस्था व व्यक्ती यांना परवानगी देण्यांत याव्यात असा ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख. अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८ चे वाचन केले.)**

**आसिफ शेख :-**

काशिमिरा, घोडबंदर रस्त्यावर बऱ्याच वर्षापासून तिथे लाईट नसल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे आणि तो रस्ता जरी ठाणे जिल्हा परिषदेच्या ताब्यात असला तरी तिथे त्याचा वापर आपल्या परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने करिता असतात आणि तिथे लाईट लावल्या पाहिजेत. जसे आपण आता भाईंदर पश्चिमेला जो पुढच्या मुर्ध्यापासून, टोल नाक्यापासून उत्तनपर्यंत भाग आहे तो रस्ता जिल्हापरिषदेच्या ताब्यात आहे. आपण स्ट्रीटच्या लाईटची व्यवस्था केली आहे. तिथे पण करायला पाहिजे. नागरिकांना त्याचा पुरेपूर उपयोग होणार आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

पहिला एक प्रयत्न करु. ठाणे महापालिकेत याच्यामध्ये पोल लावून लाईन लावून देणारी जाहिरात फ्री करुन मिळत असेल तर करु नाही तर मग आपल्या खर्चाने करु.

**दिपक खांबित :-**

त्याला ५० हजार खर्च आहे आणि एम.एस.आर.डी.सी.कडे विचारणा केली.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कारण काशिमिरा रोडवर एक जण आला होता.

**दिपक खांबित :-**

एम.एस.इ.बी.वाले लावत नव्हते आणि बी.एस.ई.एस.वाले फाऊंटन हॉटेलपर्यंत लावत होते.

**आसिफ शेख :-**

तसे असेल तर ऑफर मागवा.

**दिपक खांबित :-**

ऑफरच मागवावी लागेल.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण करायचेच आहे.

**आसिफ शेख :-**

ऑप्शन ठेवा, चालेल. नाईक साहेब म्हणतात त्याप्रमाणे जर पैसा तिथे वाचत असेल तर आपण तसे करु या, पण ती लाईट लावून टाका. ऑफर मागवा, काहीही करा. पण लोकांना वेठीस धरु नका.

**जोजफ घोन्सालवीस :-**

उत्तनला दिले, चौकला दिले. महासभेत मंजुर झाले आहे. पण लागत नाही.

**मा. सभापती :-**

स्ट्रीट लाईट लावायचे कधी चालू होणार आहे.

**दिपक खांबित :-**

स्ट्रीट लाईट लावून झालेल्या आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कुठे आहे? काहीही चालू होत नाहीत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

गावामध्ये कमी पडले असतील तर लावा. पण शासकीय जागेवर वाढीव चालले आहे. तिकडे लाईट लावण्याच्या भानगडीत पडू नका.

**प्रकरण क्र. ८ :-**

ठाणे - घोडबंदर रस्त्यावर ठाणे जकात नाका ते वर्सोवा नाका (फाऊंटन हॉल) पर्यंत रस्त्याच्या मध्यभागी स्ट्रीट लाईट बसविणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. १० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र ७९.४० चौ.किमी एवढे असनू विभाग काजुपाडा ते उत्तन व दहीसर चेकनाका ते वर्सोवा ब्रीज असा पसरलेला आहे. शहराची लोकसंख्या सुमारे ७.०० लक्ष एवढी आहे. महानगरपालिका हद्दीत येणारा ठाणे - घोडबंदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांच्या

ताब्यात असून काजूपाडा, चेणा ही गावे सुद्धा महानगरपालिका हद्दीत असून सदर भागात जंगल असल्याने रस्त्यावर रात्रीच्या वेळी हिस्त्र पशूंचा वावर असतो. सदर रस्ता हा नेहमी वाहतुकीने गजबजलेला असून सदर रस्त्यावर ठाणे महानगरपालिकेचा जकात नाका ते वर्सोवा जंक्शन पर्यंत स्ट्रीट लाईट बसविण्याची मागणी होत आहे. सदर भागात MSEB मार्फत वीजपूरवठा केला जातो. सदर भागात Reliance Energy मार्फत वीजपूरवठा नसल्याने त्यांच्यामार्फत स्ट्रीट लाईट बसविण्यांत येणार नसल्याने महानगरपालिकेस सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी घेऊन स्ट्रीट लाईट बसवावी लागणार आहे. महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) ते उत्तन चौक रस्ता सुद्धा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असून महानगरपालिकेने स्ट्रीट लाईट बसविल्या आहेत. तरी ठाणे - घोडबंदर रस्त्यावर ठाणे जकात नाका ते वर्सोवा जंक्शन पर्यंत संबंधित विभागाची परवानगी घेणेस व त्यांच्या मागणीनुसार चार्जेस भरणेस व स्ट्रीट लाईट बसविणे कामी येणाऱ्या रु. ५२,००,०००/- खर्चास अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.          अनुमोदन :- श्री. हरेश गावंड.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९ चे वाचन केले.)**

**जोजफ घोन्सालवीस :-**

विविध समाजमंदिरे म्हणजे कुठली समाजमंदिरे?

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे समाजमंदिरे आहेत. म्हणजे संपूर्ण मिरा भाईंदर मधील समाज मंदिरे.

**धनराज अग्रवाल :-**

तुमच्याकडे पूर्ण समाज मंदिरची यादी आहे का? बोला ना, किती समाजमंदिरे आहेत? किती समाजमंदिरे चालू आणि किती समाजमंदिरे दुसऱ्या कामाला वापरतात.

**दिपक खांबित :-**

समाजमंदिरे चालवायला कोण देत नाहीत.

**धनराज अग्रवाल :-**

समाजमंदिरे नगरपालिकेची किती प्रॉपर्टी आहे. ती आपली प्रॉपर्टी आहे ते तरी तुम्हांला माहिती आहे का? ते दुसरे लोक वापरत असतील याचा आमच्याकडे पुरावा आहे. तुम्हांला माहिती नसेल, कुठे दरवाजे नाहीत, खिडक्या नाहीत, लोक दारु पितात, संध्याकाळी जुगार खेळतात. त्याचे तुम्ही काय करता?

**दिपक खांबित :-**

त्याची माहिती नाही.

**आसिफ शेख :-**

ज्या ज्या प्रभागात असेल त्या त्या प्रभागातील मला वाटते नगरसेवकांनी पण समाजमंदिरामध्ये लक्ष द्यायला पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

राई गावातील मला माहिती आहे. राई गावातील जे समाजमंदिर आहे त्याच्यात हेच धंदे चालतात.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

समाजमंदिर म्हणजे काय? त्या समाजाच्या चांगल्या कामासाठी वापरण्यासाठी त्या समाजाला दिलेली. मग तो समाज दुरुपयोग करिता असेल तर त्या नगरसेवकांनी ताकीद द्यायला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

समाजमंदिर म्हणजे ते सगळ्या समाजासाठी आले.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तुमचा प्रश्न बरोबर आहे. आम्ही समाजमंदिर महापालिकेच्या माध्यमातून तुमच्या वॉर्डामध्ये निर्माण केली. त्यावेळेला तुम्ही नगरसेवक असाल किंवा नसाल. आपल्या प्रॉपर्टीचा वापर कसा होतो हे बघण्यासाठी एक वॉचमन नेमला तर त्याचा पगार फार मोठ्या प्रमाणात जाईल. म्हणजे समाजमंदिर बांधायचे आणि परत वॉचमन नेमायचा तर नगरपालिकेचे प्रिमायसेस आहेत. तुमची मंडळे असतील, धार्मिक ट्रस्ट असेल, सार्वजनिक संस्था असतील. या लोकांनी जे चांगल्या प्रकारे वापर करा अशी ताकिद केली तर बरे होईल. इमारतीची दुरुस्ती जी काही करायची ती आम्ही करु. तुम्ही जरा चांगला वापर करा. दारु पिण्यासाठी, जुगार खेळण्यासाठी वापरु नका असे सांगा. आम्ही काय करणार? तिथे जाऊन त्यांची नांवे घेणार आणि पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करणार. आम्ही गुन्हा दाखल केला तर तुम्ही म्हणणार, का हो साहेब हे कशाला गुन्हा दाखल करता? रिक्वेस्ट करतो की, त्या त्या वॉर्डातील नगरसेवकांनी कृपा करुन त्या इमारतीचा वापर नीट करणेविषयी मंडळांना आपल्याच वॉर्डातील नागरिक आहेत तर आपण त्यांना समजुत घालावी अशी माझी विनंती आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पालीला दोन समाजमंदिरे आहेत. आता बांधलेले एक आहे आणि एक जुने आहे. १० वर्षापासून एक व्यापारी मासळी साठवितो आहे. १० वर्षाच्या भाड्यासकट ते वसुल करा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

दहा वर्षापुर्वी तुम्ही अर्ज केलेला नाही का? प्रॉपर्टी टॅक्सचे बिल पाठवायचे. भाड्याची मासळी जी दहा वर्षे वाळवते. दहा वर्षापासून प्रॉपर्टी टॅक्सेच बिल पाठवायचे.

**धनराज अग्रवाल :-**

मागे आपण प्रॉपर्टी टॅक्स वाढवला त्याचे किती वसुल झाले ते विचारा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

भाडे कुणीतरी नगरसेविका देते असे ऐकले होते.

**मा. सभापती :-**

त्यांना सात दिवसांत खाली करायला सांगा. खांबित यांना घेऊन जा, खाली करुन सर्व माल जप्त करुन घ्या. त्याचे पैसे आपल्याकडे येतील.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण जिथे हे घेतो तिथे ५० पर्यंत गाड्या आहेत. आपण त्यांना ८०० रुपये लावले होते.

**धनराज अग्रवाल :-**

वसुल झाले काय तेवढेच विचारतो?

**जोजफ घोन्सालवीस :-**

७०० रुपये आपण कमी केले होते.

**धनराज अग्रवाल :-**

कमी केल्यानंतर वसुल झाले का नाही?

**प्र. सचिव (विजय पाटील) :-**

वसुल झालेले नाहीत. सदस्यांनी पत्र दिलेले आहे की, हे भाडे कमी करावे.

**मा. सभापती :-**

आपण हा विषय पुन्हा स्थायी समितीमध्ये घेऊ.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, दोन वेळा हा विषय घेतला. आता परत परत असा विषय घेता येत नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

वसुली करण्याची अडचण आमची काहीही नाही आहे. जे विक्री करायला बसतील त्यांची घरेसुद्धा जप्त करु. परंतु, ती जी प्रत्येक समाजाची वेगवेगळी लोक, वेगवेगळ्या गटातून आली की, हे एवढे परवडणार का? मग बाहेर बसत होतो. मग दहा रुपयात भागवतो. मग आत बसल्यानंतर इतके का? हे सुरु झाले आणि सगळे भाडेकरु आमच्याकडे आले. तुम्ही म्हणत असात वसुल करा, उद्यापासून सुरु, एक महिन्यात क्लिअर.

**धनराज अग्रवाल :-**

तुम्ही म्हणत असाल काय? प्रस्ताव पास झालेला आहे. थोड्या लोकांनी मानलेला आहे. तुम्ही असे काय बोलता?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

पण २००-३०० लोक आली आणि सभापतींनी त्यांना सांगितले.

**धनराज अग्रवाल :-**

तुम्ही आमच्यावर कशाला टाकता? थोड्या लोकांनी पास केलेला आहे.

**आसिफ शेख :-**

आम्ही जरी पास केला तरी प्रशासनामार्फत टिपणी आलेली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

एक मिनिट समजावून सांगतो, ६०० रुपयाचे भाडे आकारणी केली, ६०० रुपयाप्रमाणे. त्याप्रमाणे आमची बिले गेली. बिले गेल्यानंतर सगळे सभापतींकडें आले. सभापती म्हणाले, फेरविचार करण्यासाठी ठेवायचे नाही. यावेळेला वसुली करु नका. आता ४६ कोटीपैकी आपण ३६ कोटी रुपये ८१ टक्के वसुल केली. त्याबरोबरच मी भाडेसुद्धा वसुल केले असते. परंतु, ती लोक सभापतींकडे आले. सभापती फेरविचार करण्यासाठी विषय घेणार आहेत आणि त्यानंतर तुम्ही वसुली करा म्हणून सांगितल्यामुळे थांबले.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, फेरविचार झाला ना.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

फेरविचार झालेला नाही. त्यानंतर सभापतींनी सांगितले.

**मा. सभापती :-**

एकदा झाले आता तेवढे कमी करुन दिल्यानंतर पुन्हा कशाला रडता? तेच मला कळत नाही.

**धनराज अग्रवाल :-**

त्या बाहेर बसलेल्यांना रु. २०/- बरोबर देतात. इकडे रु. ६००/- देत नाहीत.

**चंद्रकांत वैती :-**

नाही. तिकडे रु. २०/- देतात. परंतु, स्थानिक जे मच्छि विक्रेते आहेत त्यांच्या खरोखर खूप अडचणी आहेत आणि त्यासाठी सर्व नगरसेवक गेले होते. त्या दिवशी आम्ही तर सांगितलेले की, स्थानिक मच्छि विक्रेत्यांना तुम्ही मोफतच द्या अशी आम्ही मागणी केली होती. परंतु, अधिकाऱ्यांनी सांगितले की, त्याला कुठल्याही पद्धतीचा चार्च लागलाच पाहिजे. तो रु. ८००/- लावला होता. तो कमी करावा असे ठरले. तर याच्याबरोबर परत एकदा विषय आणा. काहीतरी चांगला मार्ग काढावा.

**आसिफ शेख :-**

स्थानिक मच्छिमारांना काहीतरी न्याय दिलाच पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

आपणच न्याय दिला आहे.

**आसिफ शेख :-**

पण पुन्हा विचार केला पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

दोनदा विचार झाला.

**आसिफ शेख :-**

आपण ठराव मंजुर करतो.

**धनराज अग्रवाल :-**

त्यामध्ये काय सांगितले गेले? बाहेर बसल्यावर आपण रु. २०/- देतो. मग आतमध्ये का देऊ नये?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तुमचे सदस्य पण आले होते.

**धनराज अग्रवाल :-**

प्रशासन काय करते? ते मी विचारतो.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती साहेब, दुसरी अडचण सांगतो. आता हे मच्छि विकण्यासाठी कित्येक ठिकाणी रस्त्यावर लोक बसलेले असतात. आतमध्ये मच्छि विकणाऱ्या महिलांची काय तक्रार असते की, बाहेरचे मच्छि विक्रते तुम्ही बंद करा म्हणजे आम्ही आतमध्ये तुम्हांला पैसे द्यायला तयार आहोत. आतमध्ये कोणीही मच्छि विकायला जात नाही. कारण दारोदारी, गल्लोगल्ली लोक मच्छि घेऊन फिरतात.

आपल्या मार्केटमध्ये त्यांना व्यवस्थित धंदाही मिळत नाही आणि आपण पुन्हा त्याच्यावर टॅक्स लावतो. त्या संदर्भात आपण काहीतरी पाऊल उचलले पाहिजे.

**मा. सभापती :-**

पुढच्या स्थायी समितीच्या सभेत आपण हा विषय घेऊ या.

**धनराज अग्रवाल :-**

भाडे काय ठेवणार आहे? शाळेच्या मुलांना तुम्ही रु. १०००/- लावता. शाळेचे मैदान शाळेच्या मुलांसाठी नाही मग कोणासाठी आहे.

**चंद्रकांत वैती :-**

त्या आपल्या शाळा नाही. ह्या महापालिकेच्या शाळा नाहीत. या मिरा भाईंदरमधील खाजगी शाळा आहेत त्यांच्याकडे ग्राऊन्ड उपलब्ध नाहीत. मग आपल्या ग्राऊन्डचा फायदा घेतला जातो.

**आसिफ शेख :-**

ते डोनेशन घेतात की नाही. मग त्यांना कमीत कमी रु. १,०००/- भरायला काय वाईट आहे?

**जोजफ घोन्सालवीस :-**

अनुदान कमी करा. रु. ५००/- द्या.

**मा. सभापती :-**

ग्राऊन्ड खराब करतात आणि शाळावाले कमवितात.

**आसिफ शेख :-**

साहेब, यामध्ये जे दर दिले आहेत, खाजगी शाळांकडून आपण घेणार. परंतु, आता उन्हाळ्याच्या सुट्टीत वगैरे किंवा आपल्या दिवाळीच्या सुट्टी आपल्या इकडची मुले वगैरे आहेत, ती मैदानात खेळायला जातात. तेव्हा पण त्यांच्याकडून पैसे घेतात. साहेब, त्यांना ते माफ करण्यांत यावे आणि खाजगी शाळांचे असतील तर त्यांच्याकडून तुम्ही पैसे घ्या.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, खाजगी शाळेचे पैसे घ्या म्हणजे माझी पण शाळा आहे. पैसे घेतले नाही तर असे नाही की, खेळाचे मैदान आपल्या शहरासाठी असते. खाजगी शाळेत जेव्हा स्पोर्टस् म्हणजे नगरपालिकेचे मैदान स्पोर्टसाठी असते. जेव्हा खाजगी शाळा तुमच्याकडे स्पोर्टस्साठी मागते त्यासाठी तुम्ही वेगळे भाडे ठेवा आणि माझे असे एक वैयक्तिक मत आहे की, खाजगी शाळा असू दे की, कोणीही असू दे. जे मैदान आपण खेळण्यासाठी बनविले त्याला सांस्कृतिक कार्यक्रम परमिशन स्टेज लावण्यासाठी द्यायचे नाही असे तुम्ही करा. कारण ते स्टेज मारुन सर्व तिकडचे खड्डे करुन ते वाट लावतात. बाकी तुम्ही भाडे वगैरे ठेवले त्यामध्ये काही कमी करा. कारण माझी शाळा आहे म्हणून मी सांगत नाही पण काहीतरी कमी करा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

विद्यार्थी म्हणून आपणही काहीतरी कमी करा. रु. ५००/- करा.

**धनराज अग्रवाल :-**

खाजगी संस्थांना रु. २,०००/-.

**आसिफ शेख :-**

जे प्रशिक्षण घेण्यासाठी घेतात त्यांच्याकडून पैसे घ्या. म्हणजे महापालिका शाळा सोडून.

**रिटा शाह :-**

साहेब, पण तिथे स्टेज बांधण्याची कोणालाही परमिशन देऊ नका. आपण असे बोलतो पण तिथे नाचायचे वगैरे कार्यक्रम होतात.

**आसिफ शेख :-**

विद्यार्थ्यांना उन्हाळ्याच्या आणि हिवाळ्याच्या सुट्टीत मुलांकडून घ्यायचे नाही. पण जे प्रशिक्षण घ्यायला येतात. त्यांच्याकडून पैसे घ्या. पण जे असेच स्वखुशीने पहाटे वगैरे खेळायला जातात. त्यांना त्यांच्यामधून वगळण्यांत यावे.

**रिटा शाह :-**

साहेब, माझी एक अशी विनंती आहे की, हे मैदान आपण देता. खाजगी म्हणजे जी संस्था रजिस्टर आहे आणि जी शैक्षणिक संस्था चालवते. तशा संस्थांना द्या. नाहीतर खाजगी अशी भरपूर लोक येणार, आम्हांला मैदान द्या म्हणून. मग त्याचा वेगळाच उपयोग होणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

खांबित, खाजगीच्या ठिकाणी शासन मान्यता शाळांना करुन घ्यावे.

**धनराज अग्रवाल :-**

खाजगी संस्थांचे कार्यक्रम रु. २,०००/- आणि पुजा-लग्नाचे रु. ३,०००/-.

**दिपक खांबित :-**

खाजगी शाळा आहेत. ते सात हजार रुपये मैदानाचे भाडे घेतात.

**चंद्रकांत वैती :-**

मोठ्या मैदानावर सात हजार रुपये भाडे घेतात.

**आसिफ शेख :-**

रिझनेबल आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

समाजमंदिराचे रिझनेबल नाहीत. रु. १,०००/- समाजमंदिराचे तुम्हांला कोण देणार?

**दिपक खांबित :-**

साहेब, लग्नाचे देतील.

**रिटा शाह :-**

समाजमंदिर म्हणजे आपण समाजासाठी बांधलेले आहे ते. तो आपला प्रश्न झाला. त्याच्यात रु. ३००/- होते. त्याचे रु. ५००/- करा. कारण गरिब लोक जास्तीत जास्त मागायला येतात.

**आसिफ शेख :-**

समाजमंदिरात ते तिकडचे झोपडपट्टीतील लोकच येतात. तर रु. ५००/- करा.

**रिटा शाह :-**

ते पण जरा महागच पडणार आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

धार्मिक कार्यक्रमाचे रु. २५०/- करा.

**चंद्रकांत वैती :-**

धार्मिकचे रु. ३००/- करा.

**धनराज अग्रवाल :-**

रु. २५०/- आणि रु. ५००/- करा. बरोबर होईल. शाळा इमारती, एक-एक रुमचे रु. ५००/- प्रति दिन सांगितले. रु. ५००/- काय हॉटेलचे भाडे झाले.

**दिपक खांबित :-**

मग रु. ४००/- करा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

शाळेचे जे भाडे घेणार ते मांडवच १००००/- एक रुमचे रु. ५००/- भरायचे.

**चंद्रकांत वैती :-**

एक रुमचे रु. ५००/- कुठे आहेत?

**दिपक खांबित :-**

सत्संगवाले पण वर्षभर घेराव घालून शाळेमध्ये असतात.

**धनराज अग्रवाल :-**

प्रति वर्ग, प्रति दिन.

**मा. सभापती :-**

अपने लोग नही लेते। सत्संगवाला लेता है उसका पैसा आने दो, वांदा नाही।

**चंद्रकांत वैती :-**

एकच रुम तयारी करण्यासाठी, सामान ठेवण्यासाठी वापरला जातो.

**अनंत पाटील :-**

आपल्याकडे साधारण मैदाने किती आहेत? इथे तीनचा उल्लेख केलेला आहे.

**दिपक खांबित :-**

महानगरपालिकेची तीन मैदाने आहेत. नवघर शाळा, राई आणि भाईंदर पश्चिम.

**अनंत पाटील :-**

त्या मोर्वाच्या मैदानाचा पण त्यामध्ये उल्लेख असायला पाहिजे. मोर्वाच्या मैदानाचे कुठे काही आहे की नाही.

**आसिफ शेख :-**

ती जागा पालिकेची आहे.

**चंद्रकांत वैती :-**

त्या विषयात काय कागदपत्र असेल तर पाहून घ्या. नसतील तर पुन्हा तसा ठराव द्या.

**धनराज अग्रवाल :-**

गेट कमानी उभारणे, बॅनर लावणे, रोजका रु. ५००/- तुम भाडा बोलते हो।

**दिपक खांबित :-**

हे टेम्परारी आहे.

**धनराज अग्रवाल :-**

टेम्परारी म्हणजे काय? ते भाडे लागले. आपण एक कमानी बनविली तो बनविणारा रु. २५०/- घेतो की, रु. ३००/- घेतो. तुम्ही म्हणता रु. ५००/- भाडे म्हणजे काय? ज्या वस्तूची किंमतच तेवढी नाही मग तुम्ही तेवढे भाडे वसुल कसे करतात.

**दिपक खांबित :-**

साहेब, कमानीच्या टेम्परारी बाजूला सगळे कागदाचे बोर्ड लावतात.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

खड्डे सहा होतात.

**आसिफ शेख :-**

त्यामध्ये असे करा. गेट आणि कमानी आहे त्याचा रेट वेगळा ठेवा आणि बॅनरचा रेट वेगळा ठेवा. बॅनर तुमचे रु. ३००/- मध्ये तयार करुन मिळते.

**धनराज अग्रवाल :-**

आम्ही बॅनर कमानी लावत नाहीत. याचेच राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेसचे लावणार आहेत.

**रिटा शाह :-**

असा पक्षाचा उल्लेख करायचा नाही. सर्वच लोक लावतात.

**धनराज अग्रवाल :-**

अहो, पण कमानी लागत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

तुम्ही पण लावा.

**धनराज अग्रवाल :-**

लावत असेल तर लावून घ्या. पण धार्मिक संस्थासाठी कमी करा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

धार्मिकला तेवढे कमी करा.

**रिटा शाह :-**

धार्मिक आणि शैक्षणिक संस्था लिहा.

**आसिफ शेख :-**

बॅनरचे वेगळे पैसे लावा. रु. २००/- करा.

**चंद्रकांत वैती :-**

बॅनर कॅन्सल करुन टाका.

**प्रकरण क्र. ९ :-**

महानगरपालिकेची मैदाने, समाजमंदिरे, शाळा इमारती भाड्याने देणे, मंडप स्टेज, गेट लावणे कामी भाडे / फी आकारणे बाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. ११ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस व नवघर शाळेसमोरील मैदान, राई मैदान ही तीन प्रमुख असून त्यापैकी भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदान व नवघर शाळेसमोरील मैदान स्थायी समितीने यापूर्वी पारीत केलेल्या ठरावानुसार रु. २५१/- प्रति दिन भाडे आकारुन भाड्याने देण्यात येतात. तसेच विविध समाजमंदिरे, शाळा इमारती मधील वर्ग सुद्धा रु. २५१/- भाडे घेऊन भाड्याने देण्यात येतात. सदर मैदाने, समाजमंदिर व शाळा इमारती महानगरपालिकेने पक्क्या स्वरुपात बांधणे, दुरुस्ती करणे कामी मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला आहे. तसेच त्यामधील शौचालय, विज व पाणी सुद्धा विनामोबदला, भाड्याने घेणारे वापरतात. सदर रु. २५१/- भाडे खूपच कमी असून त्यामध्ये देखभालीचा खर्च सुद्धा वसूल होत नाही. भाईंदर (प.) विनायक नगर समाजमंदिर सुद्धा अद्ययावत करण्यात आलेला आहे. महानगरपालिकेमार्फत रस्त्यावर

विविध कार्यक्रमाकरीता मंडप, बॅनर, कमानी, गेट उभारण्यांस परवानगी देण्यांत येते. सदर कामी रु. १०/- प्रति दिन एवढी रक्कम देण्यांत येते. सदर रक्कम सुद्धा खूपच कमी आहे.

यापूर्वी मा. स्थायी समितीने पारीत केलेल्या ठरावानुसार वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे वापराकरीता भाडे / फी आकारण्यांस शिफारस प्रशासनाने केली आहे.

| | |
|---|---|
| १) **मैदाने** | |
| अ) शाळांच्या खेळाचे कार्यक्रम | रु. ५००/- प्रति दिन (महापालिका शाळा सोडून) |
| ब) खाजगी संस्थांचे कार्यक्रम (सुट्टीच्या दिवसात) | रु. २०००/- प्रति दिन |
| क) पूजा / लग्न कार्यक्रमाकरीता | रु. ३०००/- प्रति दिन |
| २) **समाजमंदिर / बालवाडी** | |
| अ) लग्न पूजा कार्यक्रम | रु. ५००/- प्रति दिन |
| ब) खाजगी संस्थांचे / धार्मीक कार्यक्रम | रु. २५०/- प्रति दिन |
| ३) **शाळा इमारती** | |
| अ) खाजगी / धार्मीक कार्यक्रम | रु. ५००/- प्रति वर्ग/दिन |
| ४) **मंडप परवानगी (विक्री करीता)** | रु. १.००/- प्रति चौ.फुट/दिन |
| ५) **मंडप परवानगी (लग्नाकरीता)/इतर उत्सव** | रु. ०.५०/- प्रति चौ. फुट/दिन |
| ६) **गेट/कमानी उभारणे/बॅनल लावणे (धार्मीक/शैक्षणीक संस्था)** | रु. २५०/- नग/दिन |
| ७) **इतर संस्था गेट/कमानी बॅनर** | रु. ५००/- नग / दिन |

वरील दर आकारण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १० चे वाचन केले.)**

**चंद्रकांत वैती :-**

ह्याच्यामध्ये आय.टी.एम. पार्क म्हणजे कुठल्या कुठल्या वस्तू येणार.

**धनराज अग्रवाल :-**

आय.टी.एम. पार्क आपल्याकडे कुठे आहे? त्यांना रिझर्वेशन कुठे आहे?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

रिझर्वेशन जरी नसले तरी टेक्नॉलॉजीचे आहेत. तंत्रज्ञानासाठी जे मटेरियल येते त्या मटेरियलवर जकात सुरु केली. ते वाचा.

**धनराज अग्रवाल :-**

हे मला मान्य आहे. पण माझे ऐका. आम्हांला हे लेटर ५ जानेवारी २००४ ला आले. आपले ऑक्टॉयचे टेन्डर केव्हा निघाले? एप्रिलमध्ये निघाले होते. याच्यामध्ये काय हेतू आहे? त्या ऑक्ट्रॉयवाल्याला परत कमी करायचे? ऑक्ट्रॉय माफ करायचे की, काय हेतू आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कमी करणार नाही.

**आसिफ शेख :-**

जकात माफ करा म्हणजे संपले.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यामध्ये आपण सुट देणार आणि त्या ठेकेदाराला कळविणार. तेवढी रक्कम आहे मी करणार नाही. कारण शासनाने काही वाढविले किंवा कमी केले ते आपोआप लागू होते.

**रिटा शाह :-**

अमेन्डमेन्ट असेल तर सर्वांना असेच लागू पडते. अमेन्डमेन्टमध्ये काही पर्यायच नसतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आम्ही रक्कम कमी करणार नाही. त्यामध्ये कमी होणार नाही.

**प्रकरण क्र. १० :-**

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. ५/१/२००४ रोजी माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २००३ अंतर्गत जाहिर केलेल्या धोरणानुसार जकात माफ बाबत.

**ठराव क्र. १२ :-**

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. ५ जानेवारी २००४ रोजी माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २००३ अंतर्गत जाहिर केल्याप्रमाणे माहिती तंत्रज्ञान सेवांना उत्तेजन देणे, ह्यासाठी सेवांना सहाय्यभूत ठरणारी कर विषयक धोरणांत सवलत द्यावी लागणार आहे.

माहिती तंत्रज्ञान (आय.टी.पार्क) युनिटमध्ये असलेल्या उद्योग, सेवा, व्यवसाय ह्यामध्ये तयार करण्यांत येणाऱ्या साहित्य-वस्तु इ. साठी आयात कराव्या लागणाऱ्या वस्तूंवर/साहित्यावर पूर्णतया जकात माफी द्यावी लागणार आहे. सध्या महानगरपालिकेने जकात वसुलीसाठी महाराष्ट्र नगरपालिका जकात नियम १९६८ लागू केले आहे. मिरा भाईंदर शहरात नव्याने स्थापन होणाऱ्या आय.टी. पार्क मधील युनिटमधील व्यवसायांना आय.टी. उद्योग उत्पादनासाठी लागणाऱ्या वस्तुवर, मालावर जकात माफीची तरतूद नाही. शासनमान्य आय.टी. पार्क मधील युनिटमध्ये आयात होणाऱ्या मालावर जकात माफी देणेचे पूर्ण अधिकार महापालिकेस असलेने या कामी येणारा माल आयातिकाने महानगरपालिका जकात खात्याकडून सदरचा माल आय.टी. पार्क मधील युनिट करिताच वापर केला जाणार आहे याबाबतचा दाखला घेणे जरुरीचे आहे. तसेच संबंधित नाक्यांवर आयातिकाने प्रतिज्ञापत्रक देणे जरुरीचे आहे.

वरील वस्तुस्थितीचा विचार करुन शासनाने माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण जाहिर केल्याने माहिती तंत्रज्ञान सेवांना उत्तेजन देण्यासाठी महानगरपालिका हद्दीत आयात होणाऱ्या आय.टी. पार्क युनिट करिता लागणाऱ्या साधन यंत्रसमुग्री व इतर संबंधित मालावर पूर्णतः जकात माफी ही सभा देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.　　　अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११ चे वाचन केले.)**

**धनराज अग्रवाल :-**

शिवार गार्डनला मी रोज व्हिजीट करतो. बोटींग एक दिवसही बंद झालेले नाही. कोण सांगते बोटींग बंद होते. कुठले बेट काढलेले.

**रिटा शाह :-**

असे करा मुदत संपल्यावर पण ते चालू होते. त्या दिवसाचे त्याचे भाडे वसुल करा.

**धनराज अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती साहेब, तुम्ही रोज तिथून येतात. आता बेट काढलेले आहे. आठ सात दिवसापुर्वी बेट काढलेले आहे. आज तिथपर्यंत तसेच चालू आहे. बेट काढलेले असेल तरी वाहतुक बोटींग चालू आहे. पैसे देऊन घेत असेल तर ठिक आहे. पण अशीच बिन पैशाने मुदवाढ घ्यायची असेल तर आमचा विरोध आहे.

**दिपक खांबित :-**

त्याने पैसे भरलेच आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

त्या रेटमध्ये परत मुदतवाढ देत असाल तर आम्हांला मंजुर आहे. पण तुम्ही असे सांगितले ते बंद होती आणि तीन महिने त्यांना वाढवून द्या. फुकटमध्ये असे नाही.

**दिपक खांबित :-**

तेव्हा जे बंद होते.

**धनराज अग्रवाल :-**

बंद एक दिवस पण नव्हते.

**दिपक खांबित :-**

साहेब, आपण तोडले ना. पावसाळा होण्याआधी आपण तोडले होते.

**धनराज अग्रवाल :-**

आपण तोडलेच नाही. संध्याकाळी पण मी तिथून जातो.

**दिपक खांबित :-**

रस्त्यावर कंपाऊन्ड हाते ते तोडले होते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

इन्क्रोचमेन्ट ज्यावेळेला होते त्यावेळेला ते पण तोडले.

**धनराज अग्रवाल :-**

कोणही सांगितले बोटींग बंद होती.

**दिपक खांबित :-**

आम्ही बघितले. उपस्थिती कमी होती.

**धनराज अग्रवाल :-**

उपस्थिती कमी होती, ती वेगळी गोष्ट आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब, तुम्ही ठरवा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ज्या दिवशी शिवाजी महाराजांच्या पुतळ्या समोरचे जे इन्क्रोचमेंन्ट होते ते आणि शिवार गार्डनजवळचे झुणका भाकर केंन्द्र ते आणि कंपाऊन्ड ही एकाच वेळेला आम्ही डिमॉलेशन केलेले आहे. फक्त त्या ठेकेदाराची एवढीच विनंती आहे की, तिकडे सगळे डबर आणि खड्डे आहेत. कोणही उभे रहायला गिऱ्हाईक आले नाही आणि मी नुकसानीत गेलो. तुमच्या मते काय मुदतवाढ द्यायची ती द्या. कारण पुर्वी १०० लोग बोटींग करत होते. असे जर गृहित धरले तर आज १५-२० लोकच आले. कारण तिथे हातगाड्या, हॉटेल काढले. सगळेच काढले आणि तो तिथे खड्डा होतो. साहेबांनीसुद्धा पाहिलेले आहे. पण त्यांनी ज्या आशेने तो लिलाव घेतला की, इतके कव्हर होईल. ते रस्ता रुंदीकरणामध्ये कंपाऊन्ड वगैरे तोडल्यामुळे उभे रहायला लोकांना जागा नव्हती. तुमच्या इच्छेप्रमाणे काय करायचे ते करा.

**चंद्रकांत वैती :-**

सहा महिन्याची मुदत द्यावी. कारण पावसाळ्याचा सीजन येतो. सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल आपण पाहिले की, रस्त्याचे काम चालू आहे. जबरदस्तीचा विषय नाही. कारण जेव्हा रस्त्याचे चालू होते तेव्हा बाजूला तो आर.एम.सी.चा प्लांट चालू आहे. त्याच्यामध्ये नक्की त्याला गिऱ्हाईकाचा तर परिणाम झाला असेल.

**आसिफ शेख :-**

तीन महिना वैसा भी नुकसान होगा।

**चंद्रकांत वैती :-**

पावसामध्ये आणखी काय होणार आहे? पावसात त्याची बोटींग पुढे जाणार आहे.

**आसिफ शेख :-**

नऊ आहेत. तीन तर आपोआप वजा होणार.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल तो माणूस मिरा भाईंदरचा स्थानिक रहिवाशी असून अतिशय सज्जन व्यक्ती आहे. असा काही धंदेवाईक दृष्टीकोन नाही. व्यापारी दृष्टीकोन नाही. चांगला माणूस आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

साहेब, प्रकरण क्र. ११ वर हे तलाव हे डॉ. हेडगेवार मार्गालगत असून आपल्या रस्त्याचे नांव डॉ. हेडगेवार मार्ग आहे की, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग आहे. प्रिन्टींग मिस्टेक आहे.

**दिपक खांबित :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

आम्हांला जी टिपणी दिली त्यामध्ये डॉ. हेडगेवार मार्ग असे लिहिलेले आहे.

**आसिफ शेख :-**

असे नजरचुकीने झाले.

**हॅरल बोर्जीस :-**

आपण जर अशा चुका करत राहिलो तर नागरिक वैतागतील.

**मा. सभापती :-**

पुर्वी आपण स्थायी समितीमध्ये मंजुरी केले. लायसन्स रिन्युअलसाठी, लायसन्स ह्याच्यासाठी नवीन विभाग करुन देणे. तर अजून तो केलेला नाही.

**आसिफ शेख :-**

नाईक साहेबांकडे जबाबदारी सोपवून द्या.

**मा. सभापती :-**

अजून काहीही केलेले नाही.

**चंद्रकांत वैती :-**

नाईक साहेबांकडेच द्या.

**मा. सभापती :-**

आता मनाळे साहेब आले. त्यांना देऊन टाका ते वसुल करतील.

**आसिफ शेख :-**

त्यांच्याकडे आस्थापना दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

आणखी एक विभाग विभागप्रमुख सांभाळू शकतील आणि आपल्याला सर्व लायसन्स फी वर्षाची किती वाढीव येईल ते माहिती पडेल. आजपर्यंन्त काही माहिती पडत नाही.

**आसिफ शेख :-**

पुढच्या स्थायी समितीला हा विषय घेऊन टाका.

**हॅरल बोर्जीस :-**

विभाग तयार करायची कोणाला तरी जबाबदारी द्या.

**आसिफ शेख :-**

लायसन्स डिपार्टमेन्टच्या कोणाला तरी जबाबदारी द्या.

**चंद्रकांत वैती :-**

तसा स्पेसिफीक विषय आणायला लागेल. आजच आपल्याला असे करता येणार नाही.

**आसिफ शेख :-**

आता चर्चा करा.

**मा. सभापती :-**

पुढच्या सभेला हा विषय घ्यायचा आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभा संपण्यापुर्वी थोडे मला बोलायचे आहे. सभापती महोदय, हा जो तुम्ही बोटींगचा विषय पास झाला आहे. पण किती महिन्यासाठी.

**आसिफ शेख :-**

तुमच्या संमतीने सहा महिने.

**धनराज अग्रवाल :-**

कशासाठी झाले. ते मी तुम्हांला मुद्दाम सांगतो. शिवार गार्डनचे सौदर्यीकरण करा मी वारंवार खांबितला लेटरही दिलेले आहे आणि त्याचे रिपेरिंग करा असे सांगितलेले आहे. आजसुद्धा त्याचे रिपेरिंग होत नाही. ती खेळणी वगैरे असेच पडलेले आहे. आजुबाजूला झोपडपट्टी झालेली आहे. फिरायलाही कोण जात नाही तर तिकडे बोटींग होणार कशी? नुकसानच होणार आहे. खेळणी अशीच सडतात.

**मा. सभापती :-**

कम्प्लेंट करा. खेळणी त्यामध्ये पडलेली आहे.

**आसिफ शेख :-**

आपले ते जुने ब्रम्हदेवाचे मंदिर आहे. त्याचे नुतनीकरण करायचे आहे. साहेब, तेथे लक्ष घाला.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ब्लिचींग बांधकाम विभागाने करायचे आहे.

**आसिफ शेख :-**

त्या ठेकेदाराला सांगू.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

किती भक्कम खोदायचे ते बांधकाम विभागाचे ठरवायचे.

**आसिफ शेख :-**

पुढचा लायसन्स डिपार्टमेंन्टचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ११ :-**

शिवार गार्डन तलाव येथील बोटींग ठेक्यास मुदतवाढ देणे.

**ठराव क्र. १३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या मालकीचे शिवार गार्डन व मांडली तलाव असून सदर तलावामध्ये बोटींग करणेसाठी ठेका बोलविण्यांत आला होता. दोन्ही तलाव तीन वर्षाच्या बोलीने ठेका पद्धतीने दि. ०१/०५/२००१ रोजी बोटींग करीता देण्यांत आलेले होते. ठेक्याची मुदत ही दि. ०१/०५/२००१ ते दि. ३१/०३/२००४ पर्यंतची आहे. ठेक्याप्रमाणे बोटींग हे दोन्ही तलावात करण्याचे ठरलेले आहे. मौजे शिवार गार्डन तलाव हा छत्रपती शिवाजी मार्गालगत असून या तलावाजवळील रस्ता रुंदीकरणाचे काम महानगरपालिकेने सन २००२-०३ या वर्षामध्ये हाती घेतले होते. या रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये शिवार गार्डनमधील डेक व भिंत व पुढील गार्डनची जागा रस्ता रुंदीकरणात गेल्याने नागरीकांना बोटींगचा लाभ घेता आलेला नाही. ही वस्तुस्थिती होती. बोटींग ठेकेदार मे. एकविरा एजन्सीस यांनी या बाबत आर्थिक नुकसान होत असल्याचे महानगरपालिकेस कळविलेले आहे. शिवार गार्डन समोरील रस्ता रुंदीकरणाचे काम जानेवारी २००३ ते सप्टेंबर २००३ पर्यंत चालू होते व या रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये गार्डनमधील भिंत, जागा आणि डेक तोडल्यामुळे नागरिकांना बोटींग करीता पायऱ्यांची व्यवस्था नसल्याने बोटींगची व्यवस्था वरील कालावधीमध्ये बंद होती. सदर ठेक्याची मुदत ३१/०३/२००४ पर्यंत आहे. परंतु माहे जानेवारी २००३ ते सप्टेंबर २००३ या नऊ महिन्यांच्या कालावधीतील वरील कारणास्तव ठेकेदारास बोटींग व्यवसाय करता आलेला नाही. म्हणून त्यांनी केलेल्या विनंतीनुसार नऊ महिने बंद असलेला कालावधी दि. ३१/०३/२००४ पासून (नऊ महिने - दि. ०१/०४/२००४ ते ३१/१२/२००४ पर्यंत) वाढवून देण्यांस ही स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वेती.** **अनुमोदन :- श्री. रिटा शाह.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अभिनंदन ठराव क्र. १४ :-**

कॉंग्रेसच्या अध्यक्षा श्रीम. सोनिया गांधी यांना नुकतीच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भरघोस यश मिळाल्याने ही स्थायी समिती त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अभिनंदन ठराव क्र. १५ :-**

ठाणे लोकसभा मतदान संघातून भाजपा-शिवसेना युतीचे उमेदवार श्री. प्रकाश परांजपे प्रचंड बहुमताने निवडून आल्याबद्दल ही स्थायी समिती त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. अनंत पाटील.          अनुमोदन :- श्री. धनराज अग्रवाल.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**मा. सभापती,**

**स्थायी समिती सभा**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**श्रद्धांजली ठराव क्र. १६ :-**

भारताचे माजी पंतप्रधान मा. श्री. राजीव गांधी यांचे १३व्या पुण्यतिथी निमित्त ही स्थायी समिती श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह.          अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**मा. सभापती,**

**स्थायी समिती सभा**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.४० वा.**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**